# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

**प्रेसनोट**

## गणेशोत्सव काळात सायंकाळी शहरातील रस्ते वाहतुकीस बंद झालेनंतर बस संचलनाचे पर्यायी मार्गांबाबत

गणेशोत्सव काळात दिनांक १९/०९/२०२३ ते २८/०९/२०२३ या कालावधीमध्ये देखावे पाहण्यासाठी पुणे शहरात मोठ्या प्रमाणात भाविक येत असल्याने शहरात वाहतुकीची कोंडी निर्माण होते. यावर उपाययोजना म्हणून वाहतुक पोलीसांकडून पुणे शहराच्या मध्यवर्ती भागातील रस्ते बस व अन्य वाहतुकीसाठी सायंकाळी सर्व साधारणपणे ०५.०० वाजताचे सुमारास बंद केले जातात. अशा वेळी विद्यार्थी, कामगार व भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून परिवहन महामंडळाकडून स्थानक निहाय पर्यायी रस्त्याचा वापर करण्यात येणार आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.क्र. | मार्ग क्रमांक | मार्गात बदल करावयाचा तपशिल |
|---|---|---|
| १ | २, २अ, ११, ११अ, ११क, २१६, २९८, ३५४, मेट्रो १२, १३, २०, २१, ३७, ३८, ८८, २९७, २८, ३०, १० | ➢ या मार्गाच्या बसेस गणेशोत्सव काळामध्ये शिवाजी रस्त्याने येण्यास प्रतिबंध केल्यानंतर जगंली महाराज रोड, बालगंधर्व, डेक्कन, संभाजी पुलमार्गे टिळक रोडने स्वारगेट चौकात येऊन पुढे नेहमीच्या मार्गाने जातील.<br>➢ टिळक रोड वाहतुकीस बंद झाल्यानंतर या मार्गाच्या बसेस शास्त्री रोडने दांडेकर पुल येथे येऊन पुढे मित्र मंडळ चौक मार्गे लक्ष्मी नारायण चौकात येऊन नेहमीच्या मार्गाने मार्गस्थ होतील.<br>➢ मात्र जाते वेळेस स्वारगेटहून शिवाजीनगरकडे जाताना बाजीराव रोडवरील वाहतुकीस प्रतिबंध होईपर्यंत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. |
| २ | ३, ६ | सदरचे बसमार्ग रस्ते बंदच्या काळात बंद ठेवण्यात येणार आहेत. |
| ३ | ५५ | सदर मार्गाच्या बसेस रस्ता बंद काळात शनिपार/मंडई ऐवजी नटराज स्थानकावरून सोडण्यात येतील. तसेच सदरच्या बसेस जाता-येता नेहमीच्या मार्गाने म्हणजेच अंबिल ओढा कॉलनी, सेनादत्त पोलीस चौकी मार्गे सुरू राहतील. |
| ४ | ५८,५९ | या बसमार्गाच्या बसेस रस्ता बंद काळात डेक्कन जिमखाना स्थानकावरून सोडण्यात येतील. |
| ५ | ८, ८१, ९४, १०८, १४३, १४४, १४४क, १४४अ, २८३ | ➢ सदरच्या मार्गाच्या बसेस कोथरूडहून पुणे स्टेशनकडे जातांना मार्गामध्ये कोणताही बदल होणार नाही.<br>➢ परंतु पुणे स्टेशन कडून येताना या मार्गांच्या बसेस ससून हॉस्पिटल, मालधक्का, जुना बाजार, म.न.पा. भवन बस स्थानक, काँगेस भवन, बालगंधर्व, डेक्कन बस स्थानक, खंडुजी बाबा चौक येथून पुढे नेहमीच्या मार्गाने जातील.<br>➢ सदरचा बदल वाहतुक पोलीसांनी लक्ष्मी रोड वाहतुकीस बंद केल्यानंतरच करावयाचा आहे. |
| ६ | ९, १७४ | ➢ मार्ग क्र. १७४ या मार्गाच्या बसेस कोंढवा गेट येथुन पुणे स्टेशनकडे येताना केळकर रोडने अ.ब.चौक येथे येऊन पुढे नेहमीच्या मार्गाने लाल महाल येथे येऊन पुढे देवजी बाबा मंदिर चौक येथुन उजव्या हाताला वळण घेऊन गुरूद्वारा रस्ता मार्गे हमजे खान चौक येथे येऊन डाव्या हाताला वळण घेऊन पुढे नेहमीच्या मार्गाने मार्गस्थ होतील.<br>➢ मार्ग क्र. १७४ पुणे स्टेशन कडून एनडीए कोंढवा गेट कडे जाताना जर लक्ष्मी रोड वाहतुकीकरीता बंद केल्यास सदर मार्गाच्या बसेस नेहमीच्या मार्गाने मॉडर्न बेकरी चौक येथे येऊन डाव्या बाजूस वळण घेऊन सेव्हन लव्हज चौकातुन उजव्या हातास वळण घेऊन स्वारगेट चौकात येतील. स्वारगेट चौकातून सरळ नेहरू स्टेडीयमवरून सारसबाग टिळक रोडमार्गे डेक्कन कॉर्नर येथे जातील व तेथुन पुढे नेहमीच्या मार्गाने संचलनात राहतील. |
| ७ | ७, १९७, २०२ | सदर मार्गांवरील बसेस रस्ता बंद काळात जाता-येता म्हात्रेपूल मार्गे स्वारगेट शंकरशेठ रोडने सेव्हन लव्हज चौकातून डावीकडे वळुन रामोशीगेट, भवानीमाता मंदिर, म.गांधी स्थानकापुढे नेहमीच्या मार्गाने जातील. मात्र भवानीमाता मंदिराजवळ रस्ता बंद झाल्यानंतर गोळीबार मैदान, म.गांधी स्थानकापुढे जाता-येता नेहमीच्या मार्गाने सुरू राहतील. |

| | | |
|---|---|---|
| ८ | १२, ४२, २९९ | या मार्गांवरील बसेस शास्त्री रोड बंद झाल्यावर दांडेकर पूल नंतर सेनादत्त पोलीस चौकी, म्हात्रेपूल वरून पुढे कर्वेरोडने डेक्कन व पुढे नेहमीच्या मार्गाने जाता-येता चालू राहतील. |
| ९ | ५, २४, २४अ, २३५, २३६ | या बसमार्गांवरील बसेस जाता-येता नेहमी प्रमाणे संचलनात राहतील. |
| १० | १८०, १८१ | वाहतूक पोलीसांनी नेहमीचा रस्ता बंद केल्यानंतर या मार्गांवरील बसेस मंगला टॉकिजनंतर, सुर्या हॉस्पिटल, कुभांरवाडा, जुना बाजार, बोल्हाई चौक, लाल देऊळ, वेस्टएन्ड, जुना पुलगेट, म.गांधी स्टॅन्ड व पुढे नेहमीच्या मार्गाने जाता-येता संचलनात राहतील. |
| ११ | ४, २६, ६८, ७१, ३३९, २३२, १०३, ८९, ९०, ६४, ७२, ७८, १९९ | गणेशोत्सव कालावधीमध्ये टिळकरोड वाहतूकीकरिता बंद झाल्यानंतर सदरचे मार्ग शास्त्रीरोड, दांडेकर पूल मार्गे संचलनात राहतील. |
| १२ | ११३, ११३अ | गणेशोत्सव कालावधीमध्ये सदरचे मार्ग दोन्ही पाळीमध्ये मनपा पंप स्थानकावरून संचलनात राहतील. |

गणेशोत्सव काळात सायंकाळी ०५.०० वाजताचे सुमारास शहरातील मध्यवर्ती भागातील रस्ते बंद झाल्यानंतर बसमार्गांमध्ये वरीलप्रमाणे बदल करण्यात आलेला आहे. तथापि ऐनवेळी वाहतुक पोलीस विभागाकडून वाहतुकीमध्ये बदल केल्यास त्याप्रमाणे बस संचलन सुरू राहील.

sd/-
**चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---

दि. १८/०९/२०२३

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

sd/-
**कामगार व जनता संपर्क अधिकारी**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---